शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पीपीपी योजनेंतर्गंत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास व खुल्या प्रवर्गातील (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक) विद्यार्थ्यांकरीता "व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती" योजनेस मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : आयटीसी-२२१७/प्र.क्र.९९/व्यशि-३**
**मंत्रालय, विस्तार इमारत, चौथा मजला,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : २९ मे, २०१९**

**संदर्भ** :
१) शासन निर्णय क्रमांक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, टीईएम-२०१४/प्र.क्र.९०/तांशि-४, दिनांक २०/०३/२०१५
२) शासन निर्णय क्रमांक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, संकीर्ण -३३१५/प्र.क्र.१७/व्यशि-३, दिनांक १४/०५/२०१५.
३) शासन निर्णय क्रमांक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इबीसी-२०१६/प्र.क्र.२२१/शिक्षण-१, दिनांक ३१/०३/२०१६.
४) शासन निर्णय क्रमांक, आदिवासी विकास विभाग, व्यअप्र-२०१६/प्र.क्र.१२२/का.१२, दिनांक ३१/०३/२०१६.
५) शासन निर्णय क्रमांक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४, दिनांक ३१/०३/२०१६.
६) शासन निर्णय क्रमांक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दिनांक १७/१०/२०१६.
७) शासन निर्णय क्रमांक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक २१/०६/२०१७.
८) शासन निर्णय क्रमांक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, टीईएम-२०१६/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक ०७/१०/२०१७.
९) शासन निर्णय क्रमांक, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, इबीसी-२०१७/प्र.क्र.२७/शिक्षण, दिनांक ०१/०१/२०१८.
१०) शासन निर्णय क्रमांक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, टीईएम-२०१८/प्र.क्र.३५/तांशि-४, दिनांक ३१/०३/२०१८.

११) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांचे पत्र क्रमांक ०७/सीटीएस/प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती/२०१८/४७३, दिनांक ०६/०८/२०१८.

१२) उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक ०७/ सीटीएस/प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती/२०१८/५२३, दिनांक ०४/०९/२०१८

१३) उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक ०७/ सीटीएस/प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती/२०१८/७२०, दिनांक १७/१२/२०१८

**प्रस्तावना :-**

राज्यात शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमार्फत शिल्पकारागिर प्रशिक्षण योजनेतर्गत (CTS) प्रशिक्षण देण्यात येत आहे. युवकांचे रोजगाराभिमुख प्रशिक्षणाद्वारे रोजगार व स्वयंरोजगारासाठी सक्षमीकरण करून खाजगी औद्योगिक आस्थापनांना लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. सद्यस्थितीत राज्यात ४१७ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसोबतच ४६६ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था देखील कार्यरत आहेत.

२. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक १४/०५/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये खाजगी व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पीपीपी योजनेंतर्गत प्रवेशासाठी उपलब्ध जागांवर केंद्रीय पध्दतीने देण्यात येणाऱ्या प्रवेशाकरीता आकारण्यात येणाऱ्या प्रशिक्षण शुल्कास मान्यता देण्यात आली आहे. खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांकरीता विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारे प्रशिक्षण शुल्क हे उत्पन्नाचे एकमेव साधन असून, शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेंतर्गत अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणारे बहुतांश उमेदवार हे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असतात. अभियांत्रिकी, वैद्यकीय तसेच पारंपारिक उच्च शिक्षण घेण्याची त्यांची आर्थिक परिस्थिती नसते किंवा शालांत परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर लवकरात लवकर रोजगार प्राप्ती करून अर्थाजन करण्याकडे त्याचा कल असतो. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश न मिळालेले विद्यार्थी आर्थिकदृष्टया सक्षम असल्यास खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेऊ शकतात. त्यामुळे फक्त आर्थिक क्षमतेअभावी विद्यार्थी कौशल्य प्रशिक्षणापासून वंचित रहात आहेत. त्यामुळे समाजातील सर्व प्रवर्गामधील आर्थिक दृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांना केवळ आर्थिक क्षमतेअभावी व्यावसायिक कौशल्यापासून वंचित रहाण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी सदर विद्यार्थ्यांना काही प्रमाणात आर्थिक सहाय्य करणे क्रमप्राप्त आहे.

३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी विभाग, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्याखालील खाजगी विना अनुदानित संस्थांमध्ये व्यावसायिक व बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ इच्छिणारे सामाजिक मागास व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील विद्यार्थी केवळ निधी अभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून वंचित

राहू नयेत म्हणून एक सामाजिक बांधिलकी व घटनात्मक उत्तरदायित्व म्हणून राज्य शासनाने शुल्क प्रतिपूर्ती करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून घेण्यात आला होता. सदरहू धोरण सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून पुढे सुरू ठेवण्याबाबतच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. या मान्यतेनुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि आदिवासी विकास विभागाने दिनांक ३१/०३/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निवडक व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या अनुक्रमे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काची १००% प्रतिपुर्ती करण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शिक्षण व परिक्षा शुल्काची अनुक्रमे १००%, १००% व ५०% इतकी प्रतिपुर्ती करण्यास (पालकांचे उत्पन्नाच्या विहित मर्यादेची अट पुर्ण केल्यास) मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक ०७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमांसाठी शासकीय, अनुदानित, विना अनुदानित संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काच्या १००% इतकी प्रतिपुर्ती देण्यात येत आहे. याच धर्तीवर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये पीपीपी योजनेंतर्गत संस्था व्यवस्थापन कोटयातील जागांसाठी व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये केंद्रीय प्रवेश प्रक्रीयेद्वारे प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती व विमुक्त जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय या प्रवर्गातील तसेच आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्काची अंशत: प्रतिपुर्ती करण्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या दिनांक ०८/०३/२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार दिलेल्या मान्यतेनुसार व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पीपीपी योजनेंतर्गत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेंतर्गत अभ्यासक्रमांसाठी केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या समाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास आणि खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० प्रवेश सत्रापासून प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यासाठी व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेस शासन याद्वारे मान्यता देत आहे.

२. सदर व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना खालीलप्रमाणे राहील :-

१) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील अभ्यासक्रमांच्या शासकीय तसेच पीपीपी योजनेंतर्गंत प्रवेशासाठी उपलब्ध जागांसाठी व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक १४/०५/२०१५ रोजीच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये प्रशिक्षण शुल्क निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार केंद्रीय ऑन लाईन पध्दतीने पीपीपी योजनेंतर्गंत प्रवेशासाठी उपलब्ध जागांसाठी व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता, उर्वरीत प्रशिक्षण शुल्काच्या ८०% इतक्या रकमेची प्रतिपूर्ती सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास आणि खुला (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील.

२) तथापि, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गंत उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक ०७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार पालकांचे एकत्रित उत्पन्न रूपये २.५० लाख अथवा त्यापेक्षा कमी किंवा त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारीत मर्यादेनुसार असल्यास, अशा सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास व खुला (आर्थिकदृष्टया दुर्बल घटक) प्रवर्गातील विद्यार्थ्याकरीता अ.क्र. २ (अ) नुसार अनुज्ञेय असलेल्या ८०% ऐवजी १००% इतक्या रकमेची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील पीपीपी योजनेंतर्गंत गठीत करण्यात आलेली संस्था व्यवस्थापन समिती व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या बॅक खात्यामध्ये विद्यार्थ्यांच्या व्यवसाय प्रशिक्षण शुल्काच्या अनुज्ञेय प्रतिपुर्तीची रक्कम आपले सरकार महाडिबीटी पोर्टल किंवा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत विकसित करण्यात येणाऱ्या स्किल व्हॉलेट या संकल्पनेच्या माध्यमातून जमा करण्यात येईल. संबंधित संस्था व्यवस्थापन समिती/खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था शासनाने विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीची अनुज्ञेय रक्कम वजा जाता उर्वरीत प्रशिक्षण शुल्क संबंधित विद्यार्थ्याकडून स्विकारू शकतील.

४) सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान) या विभागाने गठीत केलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत स्किल व्हॉलेट ही संकल्पना विकसित करण्यात येईल.

३. प्रस्तूत योजनेंतर्गंत खालील अटीं व शर्तींची पूर्तता करणारे विद्यार्थी शुल्क प्रतिपूर्ती करीता पात्र राहतील.

१) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील पीपीपी योजनेंतर्गत प्रवेशासाठी उपलब्ध जागांसाठी व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेद्वारे प्रवेश घेणे बंधनकारक राहील. खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील संस्था व्यवस्थापन कोटयातील जागांवर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर योजना लागू राहणार नाही.

२) विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाच्या दिनांक १६/१२/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये उन्नत व प्रगत गट याकरीता नॉन क्रिमीलेअर साठी निश्चित केलेल्या उत्पन्न मर्यादेनुसार विद्यार्थ्यांच्या पालकांचे एकत्रित उत्पन्न रूपये ८.०० लाखाच्या मर्यादेत किंवा उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक ०७/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार पालकांचे एकत्रित उत्पन्न रूपये २.५० लाखाच्या मर्यादेत असणे आवश्यक राहील. या पृष्ठर्थ विहित प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र सादर करणे क्रमप्राप्त असेल. सदर प्रमाणपत्र पाच वर्षासाठी वैध राहील. सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र पालकांच्या प्रत्यक्ष उत्पन्नापेक्षा कमी आढळून आल्यास/बोगस आढळून आल्यास सदर प्रमाणपत्र निर्गमित करणारे अधिकारी, सबंधित विद्यार्थी आणि पालकाविरूध्द फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात येईल.

३) सक्षम प्राधिकाऱ्याकडून संबंधित विद्यार्थ्यांस कुटूंबाच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र देताना त्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे (आई व वडील यांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न विचारात घ्यावे. विद्यार्थ्यांचे आई-वडील (पालक) हयात नसल्यामुळे उत्पन्न प्रमाणत्र सादर करण्यास अडचण असल्यास उत्पन्न प्रमाणपत्राऐवजी संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची तपासणी करून त्याप्रमाणे पात्रतेकरीता प्रमाणित करून योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांस सर्व कागदपत्रांसह शिफारस करावी. अशा प्रकारे प्राप्त शिफारशींच्या आधारे प्रकरणनिहाय तपासणी करून योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याने अशा अनाथ विद्यार्थ्यांना योजनेच्या पात्रतेसंदर्भात पुढील कार्यवाही करावी.

४) विद्यार्थ्यांने यापूर्वी खाजगी व शासकीय औद्योगिक संस्थेमध्ये कोणत्याही अभ्यासक्रमांचा लाभ घेतलेला नसावा.

५) तसेच राज्य/केंद्र शासनाच्या विभागाने अथवा त्यांच्या अधिपत्याखालील स्थानिक प्राधिकरण, कंपन्या अथवा महामंडळे यांनी पुरस्कृत केलेल्या कोणत्याही प्रशिक्षण कार्यक्रमाचा यापूर्वी लाभ घेतलेला नसावा.

६) विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक आहे.

७) DGT, नवी दिल्ली अथवा MSCVT यांनी मान्यता दिलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकडयांच्या प्रवेशित जागांवर प्रवेश घेणे बंधनकारक राहील.

८) सदर योजनेचा लाभ हा कुटूंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहील.

९) सदर योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी संबंधित शैक्षणिक वर्षात इच्छुक अर्जदार प्रशिक्षणार्थ्यांची प्रवेशित अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षण वर्गातील उपस्थिती ही , DGT, नवी दिल्ली यांनी विहित

केलेल्या निकषानुसार असणे आवश्यक राहील. सदर उपस्थिती आधार संलग्नीत बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीवर नोंदविणे आवश्यक राहील.

१०) अर्जदार विद्यार्थ्यास प्रत्येक सत्र परिक्षा अथवा वर्षाची परिक्षा देणे आवश्यक राहील. केवळ विशिष्ट परिस्थितीत विशेषत: आजारपणाच्या कारणास्तव परिक्षा देणे शक्य झाले नसल्यास तसे विद्यार्थी व संबंधित संस्थेने शिफारस केल्यानंतर सहसंचालक,प्रादेशिक विभाग यांनी प्रमाणित करणे आवश्यक राहील.

११) संबंधित विद्यार्थी स्वत:च्या चुकीच्या वर्तनामुळे समाधानकारक शैक्षणिक प्रगती करत नसल्याबाबत किंवा संबंधित प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय अनियमित असणे अथवा गैरहजर रहाणे इत्यादी स्वरूपाचे गैरवर्तन करत असल्याबाबत शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखांने निदर्शनास आणले तर अशा विद्यार्थ्यांकरीता संस्थेला शुल्क प्रतिपुर्ती अनुज्ञेय राहणार नाही.

१२) या योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांने प्रशिक्षण मध्येच सोडले तर अशा विद्यार्थ्यांकरीता संस्थेला अथवा संस्था व्यवस्थापन समितीस अदा करण्यात आलेली प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती राज्य शासनास योग्य वाटल्यास वसुल करण्यात येईल.

४. सदर योजनेमध्ये व त्याच्या अंमलबजावणीबाबत कोणतीही पूर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास रहातील व असे बदल केल्यामुळे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्याबाबतचा दावा कोणत्याही विद्यार्थ्यांस व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस अथवा विद्यार्थ्यांच्या पालकांना शासनाच्या विरूध्द करता येणार नाही.

५. या प्रयोजनार्थ सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणालीवर सर्व प्रशिक्षणार्थ्यांची उपस्थिती नोंदविणे आवश्यक राहील. सदर बायोमॅट्रीक प्रणाली स्वखर्चाने सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांनी उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

६. कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासक्रमांच्या प्रशिक्षण शुल्कामध्ये, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाने उन्नत व प्रगत व्यक्ती/गट या करीता नॉन क्रिमीलेअर साठी असलेल्या उत्पन्न मर्यादेमधील तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेकरीता पालकांच्या उत्पन्नाची विहित केलेली मर्यादा यांमध्ये भविष्यात केलेले बदल/सुधारणा व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेकरीता लागू राहतील.

७. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने स्किल व्हॉलेट ही संकल्पना विकसित करण्याची जबाबदारी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांची राहील.

८. सदर योजनेकरीता निधीची तरतूद व खर्च करण्यासाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या मागणी क्रमांक झेडए-२ अंतर्गत २२३० कामगार व सेवायोजन या प्रधान लेखाशिर्षांखाली स्वंतत्र उप लेखाशिर्ष व संगणक सांकेतांक वित्त विभागाच्या व महालेखापालांच्या मान्यतेने उघडण्यात येईल. तसेच सदर योजनेकरीता आवश्यकतेनुसार निधीची मागणी करण्याची जबाबदारी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांची राहील.

९. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना लागू करण्याबाबतचे आदेश सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यांचेमार्फत स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

१०. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमाक १९६/१४७१, दिनांक १५/१०/२०१८ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमाक २९/व्यय-६ दिनांक १२/०२/२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०५२९११२६२२९५०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Baban Sheshrao Mandwe

Digitally signed by Baban Sheshrao Mandwe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development And Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d101a905c7fca95ea9a4a68053d53dda9fcd8b54a203c383517611e96421b187, cn=Baban Sheshrao Mandwe
Date: 2019.05.29 11:33:16 +05'30'

**(ब.शो. मांडवे)**

उप सचिव,महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री, अल्पसंख्यांक विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा. राज्यमंत्री, अल्पसंख्यांक विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

९. मा.मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई
१०. मा. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११. मा. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१३. मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक
१४. सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
१५. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
१७. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय (सर्व)
१८. प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (सर्व)
१९. महालेखापाल ( लेखा वअनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२०. महालेखापाल ( लेखा वअनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
२१. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२२. महालेखापाल ( लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
२३. अधिदान व लेखा अधिकारी ,मुंबई,
२४. निवासी व लेखा परीक्षा अधिकारी ,मुंबई,
२५. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय (सर्व)

**प्रत,**

१. मा. सभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२. मा. अध्यक्ष, विधान सभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे स्वीय सहाय्यक
६. उप सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,मंत्रालय, मुंबई,
७. निवड नस्ती. (व्यशि-३)